| MHPU120002882020 | **नियमित दिवाणी दावा क्र. ४६/२०२०**<br>**आदेश निशाणी क्रमांक १४५**<br>**(सुभद्राबाई उर्फ शकुंतला शिवाजी तरस वि. अमर किरण बालघरे )** |
|---|---|

वादी यांनी प्रस्तुचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. १२ शशिकांत वसंत उमाप यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादी यांचे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १२ शशिकांत वसंत उमाप हे दिनांक १३/१०/२०२५ रोजी मयत झालेले आहे. त्यांना वसंत विश्वनाथ उमाप, अमर वसंत उमाप आणि धनंजय वसंत उमाप असे कायदेशीर वारस आहेत. सबब, सदर वारस अभिलेखावर घेण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३, ६, ७अ ते ७क यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. १२ यांच निधन झाल्यानतर ९० दिवसांचे आत वारस रेकॉर्ड वर घेण्याचा अर्ज दाखल केलेला नाही. सदरचे प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा अवसान झाला आहे. वादी यांनी सदरचे प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा अवसान झाल्यानंतर प्रथमतः सदरचे अबेटमेंट हे सेट असाईट करणे आवश्यक आहे त्याशिवाय वारस रेकॉर्ड वर घेण्यास झालेला उशीर माफीचा अर्ज व वारस रेकॉर्ड घेण्याचा अर्ज यांच्यावर आदेश पारीत करता येणार नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १७ ते २० यांनी

देखिल त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. त्याच्या कथनाप्रमाणे सदर अर्जास विलंब झाल्याने सदर अर्ज चालण्यास पात्र नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**४.** अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी वाटप, ठराव व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम ४ अन्वये प्रतिवादीचा मृत्यू झाल्यास आणि दावा चालविणेचा अधिकार टिकून राहील्यास त्याबाबतीत, तसा अर्ज करण्यात आल्यास न्यायालयाने मृत प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस पक्षकार करणेची व्यवस्था केली पाहिजे व दावा पुढे चालू ठेवला पाहिजे. सबब, उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित करणे आवश्यक आहे.

**५.** सदरचा दावा हा वाटप, ठराव व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता प्रतिवादीच्या मृत्यपश्चात देखिल दावा चालविण्याचा अधिकार कायम राहतो. तसेच मयत प्रतिवादी यांचे अर्जात नमूद वारसां व्यतिरिक्त इतर वारस असल्याबाबत सद्यस्थितीत कोणताही वाद दिसून येत नाही. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दावा गुणदोषावर निकाल होणेस मदत होणार आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश देखिल रदद करण्यात आलेला आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. परिणामतः खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## - आ दे श -

**१.** अर्ज (निशाणी क्र  १४५ ) मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी यांनी अर्जात नमूद वारसांबाबत योग्य ती दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करावी. तसेच दाव्याची दुरुस्त प्रत सत्वर दाखल करावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.08.17 17:37:08 +0530

ठिकाण – भोर

( एस.डी.शिरसाट )

दिनांक – १७.०८.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर.